# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश

जा.क्र सनिक/प्रलि/मसेसहपतसंमक/कलम७७ (अ)/१२७९/२०१४
कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
दि. ०९/१२/२०१४

**वाचाः-**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) आणि ७७ (अ).
२) श्री डी. आर. केदारे, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे पत्र दि. ०८/११/२०१४

ज्याअर्थी, महाविदयालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदींनुसार नोंदविली आहे व संस्थेने उक्त अधिनियम, नियम व तिच्या उपविधीतील शर्तींचे पालन करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या समितीची मुदत संपण्यापुर्वी तिची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे, हे समितीचे कर्तव्य आहे. समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यात बुद्धीपुरस्सर कसुर केली असेल तेव्हा समितीचा पदावधी संपल्यानंतर तिचे सदस्य अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियममाच्या कलम ७७- अ अन्वये कार्यवाही करील.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१४) नुसार या कार्यालयातील उपलब्ध माहिती आधारे आपल्या संस्थेची निवडणूक घेण्याबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यात आले होते आणि त्यांचे मान्यतेने संस्थेची निवडणूक घेण्यात आली व त्यावेळी समिती सदस्य निवडण्यात कसुर झाली आहे.

त्याअर्थी, उक्त संस्थेच्या समितीचा पदावधी संपुष्टात आलेला असल्याने संस्थेची निवडणूक घेण्यात आली व त्यावेळी समिती सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे. म्हणून समिती सदस्यांवर त्वरित कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्यांना अशी नोटीस प्रसिद्ध करणे, वाजवीरित्या व्यवहार्य नाही, अशी माझी खात्री झाली आहे. सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(ब) मधील तरतुदीनुसार संस्थेची समिती निष्प्रभावित करून संस्थेचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी व निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्याकरिता संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक झाल्याने मी, पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## -: आदेशः-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१)(ब) आणि (फ) (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी. डॉ. अं. आ. वाघमारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कन्नड, महाविदयालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद या संस्थेचे सांप्रतचे संचालक मंडळ निष्प्रभावित करीत आहे. आणि,

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१) (फ) (दोन) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री डी. बी. परदेशी, सहकार अधिकारी श्रेणी-१ संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कन्नड यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. त्यांनी सदरील संस्थेचा पदभार घेवून तसा अहवाल सादर करावा. आणि, संस्थेची निवडणूक प्रकिया त्वरित सुरू करून दोन महिन्यांचे आत पुर्ण करावी.

सदरचे आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक. ०९/१२/२०१४ रोजी पारीत करीत आहे.

**( डॉ. अं. आ. वाघमारे )**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, ता.कन्नड**